



Title Code- MAHMAR-51647

# दैनिक जनसंचलन

निडर निर्भिड

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे    अंक : ६९८. वा    सोमवार    दि.०४ मार्च २०२४    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये

# जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाऱ्यांकडून वसुली कधी करणार?

## डॉ.पंडित, डॉ.तडसांच्या कार्यकाळात अनिर्बंध भ्रष्टाचार...

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील जिल्हा सामान्य रुग्णालयात बोकाळलेल्या भ्रष्टाचारातून आजवर आलेल्या विविध अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात मलिदा लाटला आहे. खरे तर या भ्रष्टाचाऱ्यांवर कारवाई करून त्यांच्याकडून शासनाच्या झालेल्या लुटीची वसुली करण्यात आली पाहिजे, परंतु त्यांच्या नंतर आलेल्या अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार थांबवण्या ऐवजी भ्रष्टाचाराची ही मालिका यथासांग पुढे सुरू ठेवली आहे. तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. पंडित व डॉ. तडस यांच्या कार्यकाळात झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई कधी करणार, हा सर्वांत मोठा प्रश्न आज जिल्हा प्रशासनासमोर आवासून उभा आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून जिल्हा रुग्णालयात बोकाळलेल्या भ्रष्टाचारासंदर्भात दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने माहिती प्रसारित करून जनसामान्यांपर्यंत या भ्रष्टाचाराची माहिती पोहोचविण्याचे काम करीत आहे. सर्वसामान्य, गरीब व गरजू नागरिकांना चांगल्या आरोग्याच्या सेवा देऊन देशात आरोग्य व्यवस्था मजबूत करण्याची जबाबदारी ज्या जिल्हा रुग्णालयावर आहे, तेच रुग्णालय भ्रष्टाचाराच्या रोगाने ग्रसित झालेले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या ठिकाणी राजरोसपणे आणि बेबंदपणे भ्रष्टाचार होतो आहे. कोरोना १९ महामारीच्या काळात जेंव्हा सर्व मानवजातीवर संकटांचे काळे ढग पसरले होते, त्या वेळी जिल्हा रुग्णालयातील अनेक भ्रष्ट अधिकाऱ्यांनी केवळ स्वतःच्या तुंबड्या भरण्याचे काम केलेले आहे. त्यातून त्यांनी मोठ्या प्रमाणा आपल्या अवैध संपत्तींचा अपसंपदेचा आकडा देखील फुगवून घेतला आहे.

### पोस्टमार्टम ६९

जिल्हा शल्यचिकित्सक असताना डॉ. पंडित व डॉ. तडस यांच्या काळात तर भ्रष्टाचाराने परमोच्च पातळी गाठली होती. जिल्हा रुग्णालयाच्या प्रत्येक विभागात भ्रष्टाचार बोकाळला होता. जिल्हा रुग्णालय हे या अधिकाऱ्यांच्या कार्यकाळात अक्षरशः भ्रष्टाचाराचे कुरणच बनले होते. कोरोना महामारीच्या काळात मोठ्या प्रमाणात औषधी व उपकरणांची खरेदी करण्यात आली होती. त्या कार्यकाळात खरेदी करण्यात आलेले साहित्य व औषधी जिल्हा रुग्णालयापर्यंत पोहोचलीच नाही. ती मधल्यामध्ये कुठे गायब झाली, याची कोणालाही माहिती नाही. दुर्दैवाची बाब म्हणजे हे सर्व तपासण्याची तसदी कर्तव्यबजावणाऱ्या कोण्याही अधिकाऱ्याने घेतली नाही. जिल्हा रुग्णालय तर सोडाच परंतु आरोग्य उपसंचालक अकोला किंवा आरोग्य संचालक मुंबई याठिकाणच्या एकाही अधिकाऱ्याने या घोटाळ्याचा तपास करण्यात रुची दाखवली नाही. यावरून एक स्पष्ट आहे की, हा घोटाळा विशेष एका मोठ्या वर्गाच्या सहमतीने झाला आहे. ज्या गुन्ह्यात एकापेक्षा अधिक लोकांचा सहभाग आहे, खरे तर त्याला संघटित गुन्हेगारी म्हटली पाहिजे. या प्रकरणात तर अनेक अधिकारी व कर्मचारी सामिल आहेत. एकीकडे हे सर्व होत असताना दुसरीकडे रोख विभागातही प्रचंड गैरव्यवहार होत होते.मिस्टर इंडिया झालेले तत्कालीन रोखपाल पी. के. माळी हे तर आज जिल्हा रुग्णालय प्रशासनासाठी मोठी डोकेदुखी बनले आहेत. रोखपाल पी. के.माळी यांनी कॅशबुकात प्रचंड खाडाखोड करून कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार केला. परंतु त्यांच्यावरही कारवाईच्या नावाने शंखच आहे. कोणतीही कारवाई होत नसल्या कारणाने मग अधिकारी हा मस्तवाल बनतो. तो चांगलाच निर्ढावतो आणि पुन्हा मोठ्या भ्रष्टाचाराला उद्युक्त होतो. जिल्हा रुग्णालयात ते वारंवार घडते आहे. मिस्टर इंडिया असलेले रोखपाल पी. के. माळी हे प्रचंड घोटाळा करून नामानिराळे झाले. पुढे ते सेवानिवृत्त झाले. त्यांनी ज्यांच्याकडे पदभार सोपवला ते श्री संत आर .एस.लाकडे देखील भ्रष्टाचारात शेरास सव्वाशेर निघाले. त्यांनी अर्धवट असा पदभार घेतला. मात्र, कामकाज ते पूर्ण पदभार घेतल्यासारखाच करीत आहेत. कारण अनेक विषयांची माहिती नसतानाही आणि अधिकार प्राप्त नसतानाही रोखपाल आर. एस. लाकडे हे प्रचंड प्रमाणात बिले अदा करीत आहेत. ही बिले वाढीव दराने असल्या कारणाने त्यात लाखो रुपयांचा गैरव्यवहार होत आहे. याबाबत जिल्हा रुग्णालय प्रशासनाकडे विचारणा केली असता, अधिकारी कानावर हात ठेवतात आणि रोखपाल लाकडे हे तर अत्यंत साळसूदपणे निष्पाप व्यक्तीसारखा चेहरा करतात. आतून सगळा भ्रष्टाचार करायचा आणि बाहेरून स्वतःला अत्यंत सोज्वळ दाखवायचे, असले ढोंग सध्या आर एस लाकडे आणि त्यांचे वरिष्ठ करीत आहेत. भ्रष्टाचाराला ठायी-ठायी आपले हातपाय पसरण्यास




जिल्हा रुग्णालयात वाव दिला जात आहे. त्यामुळे दिवसेंदिवस जिल्हा रुग्णालयाची अवस्था ढासळत चालली आहे. जिल्हा रुग्णालयातील सेवा पूर्णपणे विस्कळित झाल्या आहेत. जिल्हा रुग्णालयात पदोपदी भ्रष्टाचार बोकाळला आहे. डॉ. पंडित असो डॉ. तडस असो की आणखी कोणी प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक असो यांच्या गैरव्यवहारांच्या प्रकरणाची सखोल चौकशी करून त्यांच्याकडून भ्रष्टाचाराच्या रकमेची वसुली करणे गरजेचे आहे. जोपर्यंत ही कायदेशीर प्रक्रिया होत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज या भ्रष्टाचाऱ्यांच्या विरोधात लढत राहील व वृत्तमालिका प्रकाशित करीत राहील. कारण हा जो भ्रष्टाचार होतो आहे, त्यातून सर्वसामान्य नागरिकांचे नुकसान होते आहे आणि दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज नेहमीच सर्वसामान्य नागरिकांच्या बाजून लढणारे वृत्तपत्र आहे. त्यामुळे आम्ही आमची सामाजिक बांधिलकी म्हणून भ्रष्टाचाऱ्यांचे बुरखे टराटरा फाडतच राहणार आहोत.

अजून बरेच काही पुढील भागात...

# दीड लाखांचे दागिने केले लंपास

**जनसंचलन/ देऊळगावराजा**

शहरातील समता नगर भागातील एका घरातून अज्ञात चोरट्यांनी एक लाख ४२ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला ही घटना २ मार्च रोजी सायंकाळी घडली या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुद्ध देऊळगावराजा पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे शहरातील समता नगरात राहणारे रवींद्र नाथा इंगळे हे एक मार्च रोजी घराला कुलूप लावून गावी गेले होते यावेळी अज्ञात चोरट्याने घराचा दरवाजाचे कुलूप तोडून



घरात प्रवेश केला घरामध्ये असलेल्या लोखंडी कपाटाचे कुलूप तोडून त्यामध्ये असलेले एक लाख ४२ हजार रुपयांचा अज्ञात चोरट्याने लंपास केला याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नांदुरा-मोताळा मार्गावर अनोळखी व्यक्तीचा खून...

**जनसंचलन/ नांदुरा**

नांदुरा ते मोताळा मार्गावरील शेतशिवारात एका अज्ञात व्यक्तीचा खून झाल्याची घटना रविवारी, ३ मार्च रोजी उघडकीस आली. नांदुरा पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, नांदुरा ते मोताळा मार्गावरील माउली पेट्रोल पंपजवळील लोणवडी शेतशिवारात अज्ञात व्यक्तीचा मृतदेह पडून असल्याचे सांगण्यात आले. नांदुरा ठाणेदार यांनी घटनास्थळ गाठले. मोताळा शहराकडे जाणाऱ्या मार्गावरील रस्त्यापासून १०० मीटर अंतरावर शेताच्या धुऱ्यावर एका अनोळखी तरुणाचे प्रेत दिसून आले. त्याच्या डोक्यावर, चेहऱ्यावर मारहाण केल्यामुळे चेहरा रक्तबंबाळ तसेच गळा आवळून खून केल्याच्या खुणा दिसून आल्या. त्यामुळे नांदुरा ठाण्यात अनोळखी आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. घटनास्थळी पोलिस अधीक्षक सुनील कळासने, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलिस अधिकारी देवराम गवळी




यांनी भेट दिली. मृतकाची ओळख पटवण्याचा प्रयत्न पोलिसांनी केला. दिलेल्या प्रत्यक्षदर्शीने माहितीनुसार, मृताच्या हातावर हर्षल नाव गोंदलेले आहे. ठाणेदार विलास पाटील यांच्या मार्गदर्शनात आरोपींचा शोध सरू आहे.

# भरधाव कंटेनरची दुचाकीस धडक; दोन ठार...

जनसंचलन/ अंजनी खुर्द




भरधाव कंटेनरने दुचाकीस धडक दिल्याने दोन जण जागीच ठार तर एक आठ वर्षीय मुलगा जखमी झाल्याची घटना दि. २ मार्च रोजी रात्री छत्रपती संभाजीनगर- नागपूर राज्य महामार्गावर घडली. रामेश्वर श्रीराम कांबळे (वय ३२, रा. देऊळगाव कोळ, ता. सिंदखेडराजा) व पंडित किसन भारसाकळे (वय ५५, रा. काडवी, ता. परतूर), अशी मृतकांची नावे आहेत. अंजनी खुर्दकडून दुचाकी (एमएच ३७ सी ६८३७) ने रामेश्वर श्रीराम कांबळे (रा. देऊळगाव कोळ) व पंडित किसन भारसाकळे (रा. काडवी) तसेच एक आठ वर्षीय मुलगा हे बिबीकडे जात होते. दरम्यान, अंजनी खुर्दनजीक एका हॉटेलजवळ दुचाकीला कंटेनर (एमएच ४० वाय १८५६) ने समोरासमोर धडक दिली. यामध्ये रामेश्वर कांबळे व पंडित भारसाकळे या दोघांचा मृत्यू झाला. परंतु आठ वर्षीय मुलगा हा सुदैवाने बचावला. घटनेची माहिती मिळताच मेहकर पोस्टेचे हेडकॉ. लक्ष्मण कटक यांनी घटनास्थळावर धाव घेऊन जखमींना तातडीने रुग्णवाहिकेतून मेहकर येथे दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी दोघांना मृत घोषित केले.

# विवाहितेचा छळ, सात जणांवर गुन्हा...

जनसंचलन/ देऊळगावराजा



माहेरवरून दहा लाख रुपये आणण्याच्या मागणीसाठी विवाहितेचा छळ केल्याप्रकरणी पतीसह सात जणांवर देऊळगाव राजा पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. महिलेने जिल्हा महिला तक्रार निवारण कक्ष यांच्याकडे न्याय मिळण्यासाठी अर्ज केला होता त्यावरून जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या आदेशान्वये हा गुन्हा दाखल करण्यात आला. शहरातील साईनगर स्थित फिर्यादी महिला अपर्णा अनिलराव जोशी ऊर्फ अपर्णा विनोद गढीकर यांच्या फिर्यादीवरून विनोद बाबूराव गढीकर पती बाबूराव दिनकर कुलकर्णी राहणार गेवराई जिल्हा बीड, चंद्रलेखा बाबूराव कुलकर्णी रा. गढी, पोस्ट रंजनी, तालुका गेवराई, जिल्हा बीड, विशाल बाबूराव गढीकर रा. धानोरा रोड, बीड, वैष्णवी विशाल गढीकर रा बीड, धनंजय बाबूराव गढीकर, मेघा धनंजय गढीकर रा. बीड यांच्याविरुद्ध देऊळगाव राजा पोलिस स्टेशनला विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शहरातील धक्कादायक घटना वर्गणी न दिल्यामुळे दुकानाची फोडली काच...

## बुलढाणा शहर पोलीस स्टेशनला आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल...

जनसंचलन/बुलढाणा



एकेकाळी बुलढाणा आहे शांततेचे शहर म्हणून ओळखले जात होते मात्र आता या शहराचे रूपांतर गुन्हेगारी प्रवृत्ती मध्ये वाढत जाताना दिसून येत आहे. शहरात रोज विविध कारणावरून गंभीर अशा गुन्हा स्वरूपाच्या घटना होत आहे. मारहाण लुटमार घरफोडी अशा विविध घटना दिवसेंदिवस वाढत चाललेल्या आहे. अशीच एक धक्कादायक घटना चिखली रोडवरील सोसायटी पेट्रोल पंपाजवळ असलेल्या अनिल भगवानदास लढ्ढा यांच्या कॉम्प्लेक्स मध्ये घडली आहे. ही घटना दिनांक २५ फेब्रुवारी च्या रात्री अकरा वाजेच्या सुमारास घडली आहे वर्गणी न दिल्यामुळे मनात राग धरून आरोपी यांनी सदर कॉम्प्लेक्स हे काचेचे असून त्याच्यावर दगडफेक करून ते फोडण्यात आले यामुळे दीड लाखाच्या वर नुकसान झाले आहे. सविस्तर वृत्त असे की तक्रारदार अनिल लढ्ढा यांनी दिलेल्या तक्रारीनुसार चिखली रोडवर यांचे चार मजली कॉम्प्लेक्स आहे. बिल्डिंगचे दोन मजल्यांना समोरील बाजूस इलीव्हेशन म्हणून काम लावण्यात आले आहे. अनिल लढ्ढा हे रात्री झोपले असताना नवकार फर्निचर चे मालक बेदमुथा यांचा फोन आला व सांगितले की तुमच्या कॉम्प्लेक्स वर काही मुले दगडफेक करत आहे म्हणून तक्रारदार हे कॉम्प्लेक्स वर आले असता सदर दगड फेक करून मुलेही पळून गेली होती सदर घटनेची माहिती शहर पोलीस स्टेशनला कळविले असता पोलिसांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली व समोर असलेल्या शबनम कॉम्प्लेक्स मधील कपड्याच्या दुकानाच्या कॅमेऱ्याची पाहणी केली असता तेव्हा सीसीटीव्ही फुटेज मध्ये काही मुले दिसून आले त्यामध्ये एक एक मुलगा अनिल लढ्ढा यांनी ओळखला तो दगडफेक करणारा सुंदर खेड येथील निलेश राठोड हा आहे व त्याच्यासोबत तीन अनोळखी मुले आहे असे तक्रारदार यांनी सांगितले. हा मुलगा माझ्याकडे वर्गणी मागण्यासाठी आला होता मात्र मी त्याला नकार दिल्यामुळे त्याने व त्याच्या सोबत असलेले तीन जण यांनी माझ्या दुकानावर दगडफेक करून काच फोडली यामध्ये माझे दीड लाख रुपयांचे नुकसान झालेले आहे. पोलिसांनी फिर्यादीच्या तक्रारीवरून आरोपी विरुद्ध ३३७ ४२७ ३४ भादविनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर व्यक्तीची तक्रार केल्यास व त्याला माहीत झाल्यास मला व माझ्या परिवारास धोका निर्माण होऊ शकतो त्यामुळे पोलिसांनी लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी असे तक्रारदार यांनी सांगितले

# . राष्ट्रीय लोक अदालतमध्ये ३ कोटी ४८ लाख रूपयांची वसुली...

जनसंचलन/ खामगाव




राष्ट्रीय विधी सेवा प्राधीकरण यांचे निर्देशाने ३ मार्च रोजी जिल्हा न्यायालय परिसरात तडजोडीयुक्त प्रकरणे एन. आय. ॲक्ट १३८, बॅक रिकव्हरी सुट, तसेच वादपूर्व प्रकरणांचे राष्ट्रीय लोकअदालत आयोजीत करण्यात आले होते. सदर लोकअदालतमध्ये पॅनल क्रं. १ वर पॅनल प्रमुख जी.बी. जाधव, जिल्हा न्यायाधीश- १ तर पंच म्हणून ॲड. दिनेश आर. वाधवानी, पॅनल क्रमांक ०२ वर ८ श्रीमती एम.बी. अत्तार, दिवाणी न्यायाधीश व. स्तर, खामगांव तर पंच म्हणुन ॲड. कु. मेघा ए. ठाकरे ह्या होत्या, पॅनल क्रमांक ०३ वर एस. एन. भावसार, सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, खामगांव तर पंच म्हणून ॲड. प्रशांत पी. दाभाडे हे होते तर पॅनल क्रमांक ०४ वर व्ही. व्ही. राजुरकर, ३ रे सह दिवाणी २१५ न्यायाधीश क. स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, खामगांव तर पंच म्हणून ॲड. संदीप जी. चापडगांवकर हे होते. सदर लोकअदालत मध्ये कलम १३८ एन. आय. ॲक्ट चे एकुण २५५ प्रकरणे ठेवण्यात आली त्यापैकी ३५ प्रकरणामध्ये रक्कम रु. ७१, ३६, ३२०/- इतकी रक्कम म्हणून वसुल झाली. तसेच मोटार अपघात प्राधीकरणाचे एकुण ५८ प्रकरणे ठेवण्यात आली त्यापैकी १० प्रकरणांत रक्कम रु.४९, ३०,०००/- इतकी वसूल करण्यात आली. फौजदारी प्रकरणे २७३ ठेवण्यात आली होती त्यापैकी ४७ प्रकरणात तडजोड होवून रक्कम रु. १३,३००/- वसूल झाला. तसेच दिवाणी प्रकरणे ३४४ ठेवण्यात आली होती. त्यापैकी ४३ प्रकरणांत यशस्वी तडजोड होवुन रक्कम रु.२,२७,२३,८४४/- इतकी वसुल झाली. कौटुंबिक वाद प्रकरणे एकुण २३ ठेवण्यात आली होती. या लोकअदालतमध्ये ग्रामपंचायत अंतर्गत व बँका, फायनान्स कंपनी असे मिळून एकूण वाद पूर्व प्रकरणे ९५७७ ठेवण्यात आली होती. त्यापैकी एकुण ३१७ प्रकरणात यशस्वी तडजोड होवुन तडजोड रक्कम रु. ४६,७४, १६४/- इतकी वसुली झाली. लोकन्यायालयामध्ये संजयकुमार बडगुजर, विधीज्ञ, खामगांव, उदय आपटे, सरकारी विधीज्ञ व इतर विधीज्ञ तसेच पं. स. मधील डि.डि. टाले, विस्तार अधिकारी, ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक, ग्रामपंचायत सचिव व पक्षकार उपस्थित होते. राष्ट्रीय लोकअदालत यशस्वीतेसाठी न्यायालयीन कर्मचारी वरिष्ठ लिपीक नितीन वसाडकर, कनिष्ठ लिपीक राम सातव व इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code- MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# संदीप शेळकेंकडून श्री संत गजानन महाराज प्रकटदिनाच्या जिल्हावासियांना अनोख्या शुभेच्छा!

## पैठणच्या धर्तीवर शेगावात उभारणार संतपीठ; संत साहित्याचा अभ्यास करणाऱ्या अभ्यासार्थींना होणार फायदा...

**जनसंचलन/शेगाव**

श्री संत गजानन महाराज यांचा १४६ वा प्रकटदिन मोठ्या भक्तीभावाने जिल्हाभरात साजरा होतोय. संत नगरी शेगावात भाविकांची मोठी गर्दी आणि ८०० पेक्षा अधिक दिंड्या राज्यातील विविध भागातून दाखल झाल्या आहेत.दरम्यान वन बुलडाणा मिशनच्या माध्यमातून जिल्ह्याच्या राजकारणातील चर्चित चेहरा बनलेल्या संदीप शेळके यांनी जिल्हावासियांना अनोख्या पद्धतीने शुभेच्छा दिल्या आहेत. जिल्ह्यात प्रसिद्ध होणाऱ्या विविध वर्तमानपत्रात संदीप शेळके यांच्याकडून करण्यात आलेल्या जाहिरातीतून संदीप शेळके यांनी जिल्हावासियांना शुभेच्छा दिल्या आहेत, शिवाय सोशल मीडियावर त्यांनी यासंबंधीची एक पोस्ट देखील केली आहे. लोकसभा निवडणुकीत जनतेने संधी दिल्यास संत नगरी शेगावात संतपीठ उभारणार असल्याचे संदीप शेळके यांनी म्हटले आहे.

वन बुलडाणा मिशनच्या माध्यमातून संदीप शेळके यांनी जिल्ह्यात राजकीय परिवर्तनाची लढाई सुरू केली आहे. आगामी लोकसभा निवडणूक लढण्याची घोषणा त्यांनी केली आहे. सध्या संदीप शेळके यांच्या नेतृत्वात जिल्ह्यात सुरू असलेली वन बुलडाणा मिशनची परिवर्तन रथयात्रा जिल्ह्यात हिट ठरली आहे. दरम्यान आज श्री संत गजानन महाराज प्रकटदिनी संदीप शेळके यांनी अनोख्या पद्धतीने दिलेल्या शुभेच्छा देखील चर्चेचा विषय ठरला आहे. जिल्ह्यातील जवळपास सगळ्याच राजकीय नेत्यांनी श्री संत गजानन महाराज यांच्या प्रकटदिनाच्या शुभेच्छा विविध माध्यमांतून दिल्या आहेत. मात्र असे असले तरी संदीप शेळके यांच्याकडून आगळ्या वेगळ्या पद्धतीने देण्यात आलेल्या शुभेच्छा लक्ष वेधून घेत आहेत. आगामी लोकसभा निवडणुकीत जनतेने संधी दिल्यास मातृतीर्थ सिंदखेडराजा, लोणार, संत नगरी शेगाव तसेच जिल्ह्यातील सर्व तीर्थ क्षेत्र, जल प्रकल्प, अभयारण्य यांना एकत्र जोडून रिलीजीअस हेरीटेज कॉरीडॉर उभारणार असल्याचे संदीप शेळके यांनी म्हटले आहे. याशिवाय श्री क्षेत्र पैठणच्या धर्तीवर वारकरी संप्रदायाचा तसेच संत साहित्याचा प्रचार प्रसार करण्यासाठी संत नगरी शेगावात संतपीठ उभारणार असल्याची घोषणा संदीप शेळके यांनी केली आहे.. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या अंतर्गत श्री क्षेत्र पैठण



येथे संतसाहित्याच्या प्रचार प्रसार व अभ्यासासाठी संतपीठ सुरू करण्यात आले आहे. संतपीठात सध्या ५ अभ्यासक्रमांसाठी प्रवेश दिल्या जातो. प्रत्येक अभ्यासक्रमासाठी दरवर्षी २० प्रवेश क्षमता आहे. एकूण १०० विद्यार्थ्यांना दरवर्षी संत परंपरेचे धडे दिल्या जातात.संत तुकाराम गाथा ग्रंथ परिचय,श्री एकनाथी भागवत, श्री ज्ञानेश्वरी ग्रंथ परिचय, वारकरी संप्रदाय परिचय आणि महानुभव संप्रदाय परिचय हे अभ्यासक्रम पैठण येथील संतपीठात शिकवले जातात. याशिवाय आणखी अभ्यासक्रमाचा देखील त्यात समावेश होणार आहे. याच धर्तीवर आता शेगावात देखील संतपीठ सुरू करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे संदीप शेळके यांनी म्हटले आहे.

# अल्पवयीन मुलीचा पाठलाग करीत होता, वडिलांनी माझ्या मुलीचा पाठलाग का करतोय म्हणून विचारणा केली असता, दगडाने केली होती मारहाण....

## आता भोगावे लागेल कर्माची फळे...

**जनसंचलन/बुलडाणा**

अल्पवयीन मुलीचा पाठलाग करीत असताना त्या मुलीच्या वडिलांनी माझ्या मुलीचा पाठलाग का करतोय म्हणून विचारले असता त्या मुलाने त्या मुलीच्या वडिलाला दगडाने मारहाण केली.सविस्तर वृत्त असे की २०१९ ऑगस्ट मध्ये सागर इटकर याने एका अल्पवयीन मुलीचा पाठलाग केला होता. त्याबाबत मुलीच्या कुटुंबास माहिती दिली असता मुलीच्या वडिलांनी आरोपी सागर अंबादस इटकर यास मावस भावासह शाळेत जाऊन जाब विचारला असता आरोपीने जमिनीवरील दगड उचलून तुम्ही मला विचारणारे कोण आहे?असा प्रश्न करत मारहाण केली होती. त्यात मुलीचे वडील जखमी झाले होते. चिखली पोलिस ठाण्यात विविध कलम



बाललैंगिक अत्याचारापासून संरक्षण अधिनियम कायद्यान्वये सागर विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तत्कालीन पोलिस उपनिरीक्षक सचिन चव्हाण यांनी बुलढाणा न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. प्रकरणात सुनावणीदरम्यान एकूण ९ साक्षीदार तपासण्यात आले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद जिल्हा न्यायाधीशआर. एन. मेहरे यांनी आरोपी सागर इटकर यास ३ वर्षे सश्रम कारावास व ५ हजार रुपये दंड आणि दंड न भरल्यास ३ महिने कारावास अशी शिक्षा २ मार्च रोजी सुनावली. वादी पक्षातर्फे सरकारी वकील ॲड. सोनाली सावजी देशपांडे यांनी प्रभावी बाजू मांडली.

# मनमानी कारभार चालवणाऱ्या तहसीलदार पिलारेंची उचलबांगडी करा - संतोष मेढे

**जनसंचलन/मोताळा**



तहसीलदार वैभव पिल्लारे यांच्या हुकुमशाही कार्यपद्धतीच्या विरोधात मागील महिन्यात सर्वपक्षीयांनी आंदोलन करूनही त्यांच्या वागणुकीत कोणताच बदल झाला नाही त्यामुळे तहसीलदार पिल्लारे यांची उचलबांगडी करण्यात यावी अन्यथा उद्या दि.४ मार्च २०२४ पासून मोताळा तहसीलसमोर उपोषण करण्यात येईल असा इशारा सामाजिक कार्यकर्ते संतोष मेढे यांनी अमरावतीचे आयुक्त यांना निवेदनातून दिला आहे.तहसीलदारांच्या निषेधार्थ सर्वपक्षीय पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी १ फेब्रुवारी रोजी तहसीलच्या आवारात बैठा सत्याग्रह केला होता परंतु तहसीलदार पिल्लारे यांच्या कार्यपद्धतीत कोणताही बदल बदल झाला नाही.तहसीलदार पिल्लारे यांच्या मनमानी कारभाराची सखोल चौकशी करून त्यांची तत्काळ बदल करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे अन्यथा उद्यापासून मोताळा तहसीलसमोर उपोषण करण्यात येईल असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे..!

# समान्य जनता आता परिवर्तन घडविणारच : रविकांत तुपकर

**जनसंचलन/ चिखली**



तालुक्यात भरघोस प्रतिसाद चिखली (बुलढाणा माझा न्युज) निर्धार परिवर्तन यात्रेच्या माध्यमातून गाव खेड्यातील सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचत आहे. प्रत्येक गावात वाडीवस्तीवर सर्वसामान्यांचा प्रचंड प्रतिसाद आणि आशीर्वाद मिळत आहेत. सर्वसामान्य जनतेच्या मनात तीव्र असा रोष दिसून येत आहे. त्यामुळे आता सर्वसामान्य जनताच जिल्ह्यात परिवर्तन घडविणार ही काळ्या दगडावरची रेग आहे, असे प्रतिपादन रविकांत तुपकर यांनी चिखली तालुक्यात निर्धार परिवर्तन यात्रेदरम्यान बोलताना केले. चिखली तालुक्यात निर्धार परिवर्तन यात्रेला अत्यंत उत्साही प्रतिसाद मिळाला. गावागावात रविकांत तुपकरांचे जंगी स्वागत करण्यात आले. घाटाखालील चार तालुके पिंजून काढल्यानंतर आता रविकांत तुपकर यांची निर्धार परिवर्तन यात्रा घाटावर पोचली आहे. ०२ मार्च रोजी चिखली तालुक्यात निर्धार परिवर्तन यात्रेचे ठिकठिकाणी स्वागत झाले. घाटाखाली ज्या पद्धतीचा भरघोस प्रतिसाद या यात्रेला मिळाला त्याच तुलनेत घाटावर देखील चिखली तालुक्यात या यात्रेला अतिशय उत्साही प्रतिसाद दिसून आला. ०२ मार्च रोजी चिखली तालुक्यातील माळशेंबा, साकेगाव, खोर, भोकर, पळसखेड दौलत, गोद्री, चांदई, मुंगसरी, खैरव, अंबाशी, उत्रादा या गावांमध्ये ही यात्रा पोहोचली. या सर्व गावांमध्ये रविकांत तुपकरांचे अतिशय जोरदार स्वागत झाले. दरम्यान रविकांत तुपकर यांनी गावकऱ्यांशी संवाद साधला, त्यांच्या समस्यांबाबत चर्चा केली. निर्धार परिवर्तन यात्रेच्या निमित्ताने जिल्हाभर फिरत असतांना वेगवेगळ्या भागातील वेगवेगळ्या समस्या प्रकर्षाने समोर आल्या. शेतकरी, शेतमजूर, सुशिक्षित तरुण, बचत गटाच्या महिला, सर्वसामान्य मध्यमवर्गीय, व्यापारी, व्यावसायिक अशा सर्वांनाच विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या सर्वांच्या समस्या सोडवण्यासाठी गेल्या काळात सत्ताधारी लोकप्रतिनिधींकडूनकोणतेच ठस असे पाऊल उचलले गेले नाही, त्यामुळे आपल्या जिल्ह्यात समस्यांचा डोंगर उभा आहे. या सर्व समस्या घेऊनच ही निर्धार परिवर्तन यात्रा काढली आहे. या यात्रेला मिळणारा प्रचंड प्रतिसाद आणि सर्वसामान्य जनतेचे आशीर्वाद पावलोपावली नवी ऊर्जा आणि बळ देत आहेत. हीच सर्वसामान्य जनता आता जिल्ह्यात परिवर्तन घडविणार आहे, असे यावेळी बोलतांना रविकांत तुपकर यांनी सांगितले.

# गण गण गणात बोते, शेगाव नगरीत लाखांवर भाविकांची मांदियाळी!...

## जिल्ह्यासह राज्यभरातून आलेल्या लाखांवर आबालवृद्ध भाविकांचा मेळा, शेकडो दिंड्या सोबत आलेले हजारो वारकरी...





**जनसंचलन/शेगाव**

सजलेले गजानन महाराज मंदिर, जिल्ह्यासह राज्यभरातून आलेल्या लाखांवर आबालवृद्ध भाविकांचा मेळा, शेकडो दिंड्या सोबत आलेले हजारो वारकरी, टाळ मृदंगाच्या तालावर होणारा गण गण गणात बोतेफ चा गजर, रात्रभर खुले असूनही दर्शनासाठी लागलेल्या दीर्घ रांगा अन भक्तिरसात चिंब भिजलेली, गजबजलेली संत नगरी विदर्भ पंढरी म्हणून भारत वर्षातच नव्हे तर साता समुद्र पल्याड ख्याती गेलेल्या शेगाव नगरीमध्ये आज रविवारी असा माहौल आहे. याला कारणही तसेच खास आहे. आज रविवारी गजानन महाराजांचा १४६ प्रगट दिन आहे. ब्रिटिश राजवटीत २३ फेब्रुवारी १८७८ रोजी एक अवलिया महापुरुष शेगाव नगरीत प्रगटला! श्रुंग ऋषींनी वसविले म्हणून आधी शृंगगाव, पुरातन शिवालय मुळे शिवगाव आणि नंतर शेगाव असे नामकरण होत गेलेल्या या नगरीत महाराज प्रगटले! दासगणू महाराज रचित विजय ग्रंथात याचे ऐन तारुण्याभीतरीं, गजानन आले शेगावनगरी; शकेअठराशेभीतरीं, माघ वध्य सप्तमी असे करण्यात आले याला पाहतापाहता १४६ वर्षे लोटली. महाराजांनी सन १९१० मध्ये ऋषी पंचमीला घेतलेल्या संजीवन समाधीला अनेक वर्षे लोटली. मात्र ङ्गमहाराज निरंतर शेगावी वास करून आहेत, संकटमुक्त करून इच्छापूर्ती करतातफ हा विश्वास व श्रद्धा पिढ्यानपिढ्या अढळ आहे. यामुळे शेगावी भाविकांचा ओघ कायम आहे आणि दिनविशेष प्रसंगी होणारी लाखांची मांदियाळी कायम आहे. आज, ४ मार्चला साजरा होणारा १४६ वा प्रगट दिन देखील याला अपवाद नाही. गजानन महाराज मंदिर अन संपूर्ण नगरी भाविकांनी नुसती फुलून गेली आहे. पायदळ वारी, दिंड्या ते विविध वाहनांनी नगरीत दाखल होणाऱ्या भाविकांनी काल संध्याकाळ पर्यंत शेगाव गाठले. रात्री व आज सकाळ पर्यंत हे आगमन सुरूच राहिले. यामुळे आज संतनगरीत लाखांवर भाविक दाखल झाले आहे. २ मार्चला दर्शनासाठी रात्रभर मंदिर खुले होते. त्यामुळे भाविकांची मोठी सोय झालीच पण संस्थान व सेवेकरी यांच्यावरील ताण कमी झाला. याउप्परही आज रविवारी मंदिरात पहाटे पासून लागलेल्या भाविकांच्या रांगा कायम आहे. प्रत्यक्ष व मुख दर्शनासाठीही भाविकांना बरीच प्रतीक्षा करावी लागत आहे.

## पातुर्डा बीट वादग्रस्त जमादार तिवारी निलंबित...

**जनसंचलन/ संग्रामपूर**

पातुर्डा बीटचे वादग्रस्त जमादार नंदकिशोर लक्ष्मी नारायण तिवारी यांनी शे. मतीन शे. मोबीन ऑटो चालकाला नाहक बेदम मारहाण केल्याप्रकरणी त्यांना निलंबित करण्यात आले आहे. कर्तव्यदक्ष जिल्हा पोलीस अधीक्षक सुनील कडासने यांच्या आदेशानुसार बुलढाणा कार्यालय अधीक्षक रिंढे यांनी ही कारवाई केली आहे. मोकाट अवैध धंदे व कायदा सुव्यवस्थेबाबत फार मोठ्या प्रमाणात तक्रारी असूनही ४ वर्षापासून पातुर्डा येथील पोलीस चौकीत जमादार म्हणून ठाण मांडून बसलेले वादग्रस्त बीट जमादार नंदकिशोर तिवारी यांनी ऑटो चालकाला प्रतिबंधक कारवाईत तामगाव पोलीस स्टेशनमधे बोलावले व त्याला बेधुंदपणे नाहक बेदम मारहाण केल्याचा व्हिडिओ काल सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. याची दखल घेऊन जिल्हा पोलीस अधीक्षक सुनील कडासने यांनी पोलीस बीट जमादार नंदकिशोर तिवारी यांना निलंबित करण्याचे आदेश दिले यावरून ही कारवाई करण्यात आली. दरम्यान काल रात्री शे. मतीन शे मोबीन रा. पातुर्डा यांनी पोलीसात दिलेल्या फिर्यादवरून निलंबीत जमादार तिवारी व यातील दुसरा एक तक्रारकर्ता शेखर पुंजाजी नृपनारायण रा. कोलद याचे विरुद्ध अप नं. ६५/२४ कलम ३२४ २९४ १०९ ५०४ ३४ दाखल करण्यात आला. पुढील तपास पीएसआय दिपक सोळंके हे करत आहेत. तर आज रविवार रोजी दुपारी ऑटो चालक शे. मतीन शे. मोबीन यांनी या घटनेबाबत शेगाव येथे पत्रकार परिषद घेऊन या घटनेतील हकिकत सांगण्याचा प्रयत्न केला व बीट जमादार यांना सेवेतून बडतर्फ करा अशी मागणी केली आहे.

## खामगाव येथे ५ दिवसांमध्ये ७० कुत्र्यांची नसबंदी...

**जनसंचलन/ खामगाव**

खामगाव शहरातील मोकाट कुत्र्यांची पैदास रोखण्यासाठी स्थानिक पालिकेने नसबंदीची मोहीम सुरू केली आहे. गेल्या पाच दिवसांमध्ये ७० कुत्र्यांची नसबंदी करण्यात आल्याची माहिती पुढे आली आहे. मोकाट कुत्र्यांचा हैदोस शहरामध्ये दिवसेंदिवस वाढू लागला आहे. त्यामुळे या कुत्र्यांच्या चाव्यामुळे अनेक जण जखमी सुद्धा झाले आहेत. कुत्र्यांचे जथ्थेच्या-जथ्थे शहरातील चौका चौकात थांबत असल्यामुळे ये-जा करणाऱ्या नागरिकांमध्ये या कुत्र्यांबाबत भीती निर्माण होऊ लागली आहे. या कुत्र्यांची पैदास रोखण्यासाठी नगरपालिकेने कुत्र्यांची नसबंदी ही मोहीम सुरू केली आहे. गेल्या ५ दिवसापासून ही मोहीम येथील मुनिसिपल हायस्कूलच्या हॉलमध्ये राबविल्या जात आहे. शहरातील मोकाट कुत्र्यांना पकडून त्या ठिकाणी आणून त्यांची नसबंदी केल्या जात आहे व ज्या कुत्र्यांची नसबंदी केली अशा कुत्र्यांना तीन दिवस ऑब्झर्वेशनखाली ठेवल्या जात आहे. आतापर्यंत ७० कुत्र्यांची नसबंदी करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे. विशेष म्हणजे नसबंदी केल्यानंतर ३ दिवस हे कुत्रे ऑब्झर्वेशन खाली ठेवल्या जातात व ज्या ठिकाणाहून मोकाट कुत्रे पकडून आणल्या जातात त्या ठिकाणी परत त्यांना सोडून देण्यात येत आहे.

## जामोद परिसरात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने नुकसान

**जनसंचलन/ जळगाव जामोद**

जामोद परिसरात २६ व २७ फेब्रुवारी रोजी सलग दोन दिवस झालेल्या जोराच्या वादळी वाऱ्यासह गारपीट व अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील उभ्या परिपक्व झालेल्या व काढणीला आलेल्या गहू, हरभरा, कांदा, मका, ज्वारीसह इतरही रब्बी पिकांचे अतोनात नुकसान झाल्याने शेतकरी कमालीचे संकटात सापडून गेले असतांनाच त्यात परत १ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजताच्या दरम्यान अचानकच विजांच्या कडकडाटासह व वादळी वाऱ्यासह पुन्हा अवकाळी पाऊस पडल्याने शेतकरी कमालीचे संकटात सापडले आहेत. हातातोंडाशी आलेले पिक निसर्गाच्या अवकृपेने हातचे गेल्याने शेतकरी चांगलेच आर्थिक संकटात सापडून गेले आहेत. जामोदसह परिसरातील सावळा, शेवगा, मालठाणा, करमोडा, सोनबर्डी, कुवरदेव, मेंढामारी, उसरासह इतरही गावातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याने शेतकरी राजा हवालदिल झाला आहे. तरी महसूल विभागाने व कृषी विभागाने तात्काळ नुकसानीचा सर्वे करून शेतकऱ्यांना त्वरित शासनाच्या वतिने नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी जमोदसह परिसरातील शेतकऱ्यांनी केली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958